सकाळ

# वाघ अभियांत्रिकीच्या ८० विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

सकाळ वृत्तसेवा

पंचवटी, ता. २३ : कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था संचालित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ८० विद्यार्थ्यांना नामवंत आस्थापनांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. निवडीतून सर्वाधिक साडेसात लाख, तर सरासरी तीन लाख रुपयांचे पॅकेज देण्यात आले. ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलमार्फत नुकत्याच मुलाखती झाल्या. यात महाविद्यालयाच्या ८० विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच महिंद्र ॲन्ड महिंद्र, इन्फोसिस, प्रॉपर्टी पिस्टल आदी नामवंत आस्थापनांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. या निवडीमुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. मुलाखत प्रक्रियेत प्रथम ऑनलाइन टेस्ट झाली. त्यानंतर टेक्निकल टेस्ट, वैयक्तिक मुलाखतीची फेरी पार पडली. त्यानंतर निकष पूर्ण करणाऱ्या ८० विद्यार्थ्यांची अंतिम निवड झाली. यात इन्फोसिसमध्ये ४३, महिंद्र ॲन्ड महिंद्र- २२ आणि प्रॉपर्टी पिस्टलमध्ये १५ अशा ८० विद्यार्थ्यांची निवड झाली. यात ५७ मुले व २३ मुलींचा समावेश आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्तगुणांना वाव देण्याबरोबरच समाजाभिमुख अभियंता निर्माण व्हावा, यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील असल्याचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी सांगितले. पुढील आठ महिन्यांत पुन्हा निवड प्रकिया राबविली जाणार असल्याचे ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी सांगितले. दरम्यान, कोरोनाकाळात या कंपन्यांनी संबंधित विद्यार्थ्यांना दिलेल्या संधीबाबत संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेव होळकर, अशोक मर्चंट, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर आदींनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Nashik, Nashik-Today
24/06/2021 Page No. 4